# सुविचार पंथ
# लहरी ज्ञानसागर

## मराठी भजनावली



लेखक :
संत जैरामदास उर्फ लहरी बाबा

॥ श्री गुरूदेव प्रसन्न ॥

श्री संत जैरामदास उर्फ लहरीबाबा
द्वारा लिखीत



सुविचार पंथ

# लहरी ज्ञानसागर

## मराठी भजनावली

द्वितीय आवृत्ती
- प्रकाशन तिथी -
जन्म सप्ताह समारोह (२००४)

■ **लहरी ज्ञानसागर**
**मराठी भजनावली**

■ **प्रकाशक**
श्री. लहरी आश्रम कामठा,
जि. गोंदिया

© **श्री. लहरी आश्रम कामठा**

■ **द्वितीय आवृत्ती**
प्रती- ५००

■ **प्रकाशन तिथी**
जन्म सप्ताह समारोह, २००४
लहरी आश्रम, कामठा.

■ **अक्षर जुळवणी**
संजय तराळ
संविस कॉम्प्यूटर्स, अमरावती

■ **मुद्रक**
न्यु पंचशील ऑफसेट, गांधीचौक,
अमरावती.

■ **पुस्तक मिळण्याचे स्थान**
लहरी आश्रम कामठा
ता.जि. गोंदिया

■ **मूल्य : रूपये १०/-**



# भूमिका

मित्रांनो आपल्याला हा मानव देह मोठ्या भाग्याने प्राप्त झाला आहे. या सुवर्ण संधीला साधून घेण्याकरीता खूप प्रयत्न केले पाहिजे. कारण की अज्ञानतेच्या पायी प्रभुच्या नामाचा विसर पडला म्हणून आम्हांस कित्येक कष्ट आणि चौऱ्यांसी लक्ष योनी भोगाव्या लागल्या.

मित्रांनो परमेश्वराची भेट घेणे म्हणजे दुसऱ्या जीव आत्म्याची सेवा करणे हीच खरी परमेश्वराची भेट होय. या करीता आपल्याला काही साधन व नियम साधले पाहिजे जसे भजन, पूजन किर्तन, श्रवण, मनन, आणि ध्यान ह्याच मार्गानी चंचल मनाला स्थिरता मिळू शकते. असा माझा अनुभव आहे.

**" केल्याने होत आहे रे, आधी केलेच पाहिजे ! "**

जो पर्यंत मनुष्य आपल्या स्वतःच्या अनुभवावरून दुसऱ्याचे दुःख ओळखू शकत नाही तो पर्यंत त्याला मानव हे पद मुळीच प्राप्त होऊ शकत नाही.

जगांत कोणी कुणाचा वैरी किंवा मित्र नाही. कर्तव्यच त्याला चांगला किंवा वाईट मार्ग दाखवू शकते.जो पर्यंत कर्म साधणार नाही तो पर्यंत मर्म अंतकरणापासून होऊ शकत नाही.पहिले पाऊल मनुष्याच्या जिवनाचे कर्म आहे.म्हणून म्हंटले आहे की,

**'कर्म प्रधान विश्व करी राखा । जो जस कर ही सो तस फल चाखा ।।"**

जो पर्यंत मानवाचे मन पवित्र, निर्मळ होऊं शकत नाही. तो पर्यंत भजन , पूजन, किर्तन इत्यादि हे कस साधणार ?

करिता मित्रांनो आपण आपल्या मनाला शुद्ध करुन अवगुणांचा त्याग करावा. तेव्हाच जनता जनार्दनाकडून परमेश्वरांची खरी सेवा घडूं शकते.विश्व हेच

मंदिर आणि त्यात राहणारे लोक हेच देव मूर्ती असे समजून त्यांची सेवा तन मन धनांनी करावी हीच खरी देवपूजा होय. जो पर्यंत सेवा करुं शकत नाही. तो पर्यंत त्याला परमेश्वराची खरी ओळख कधीही होऊ शकत नाही.

**"आत्मा नही जाने तो परमात्मा कैसे पहचाने ।"**

म्हणून दुःखी आत्म्याची सेवा करुन पुण्य संचय करावा.

**"जे का रंजले गांजले त्यासी म्हणावे आपुले ।"**

संताचे वाक्य आहेत की, पाप पूण्य सम झाले म्हणूनच आम्हाला नरदेह मिळाला आता ह्या सुवर्ण संधीला खोवून बसलो तर पुन्हा लक्ष चौऱ्यासी फेरे भोगावे लागतील लक्ष द्या.

**"सेवा केल्यानेच मेवा मिळत असतो"**

प्राचीन काळापासून साधुसंत महात्म्यांनी निरनिराळ्या प्रकारांनी सेवा करुन आपले जीवन सफल केले आहे. कोणत्याही सेवेच्या प्रकारांत लागून आपले जीवन सफल करावे. ती सेवा मानापासून केली पाहिजे तर फळ नक्कीच प्राप्त होईल.

दुसऱ्या कोणत्याच योनीत सेवा करण्याची संधी मिळणार नाही जसे- कायीक, वाचीक व मानसीक हे सेवेचे मुख्य प्रकार आहेत. तरी कोणत्याही प्रकाराने परमेश्वराची सेवा केली पाहिजे हीच माझी नम्र विनंती आहे.

**- जैरामदास**

कामठा आश्रम,
गुरु पोर्णीमा
इ. स. १० जुलाई १९६८

## - अनुक्रमणिका -


| | | |
|---|---|---|
| १ | ऐक माझी तव विनवनी | १ |
| २ | हरी तू बैस या नयनी | २ |
| ३ | मना तू धर सूसंगती | २ |
| ४ | देवा तुझ्या वाचूनी | ३ |
| ५ | खोटा नाटा जरी जाल | ३ |
| ६ | यशोदा तुझा कान्हा | ४ |
| ७ | धैर्य सोडू नको मना | ५ |
| ८ | आम्हा साडूनी कुठे जाता | ५ |
| ९ | प्रभू तुझा माझा कसा | ६ |
| १० | शिवभवाणी राणी | ७ |
| ११ | तुजविन दुःख सेवा | ७ |
| १२ | सोडली लाज हरी पायी | ८ |
| १३ | पाहू चला हरी भोळा | ९ |
| १४ | चुगली चहाडीत हुशार | ९ |
| १५ | टाकलास कुणब्याच्या पोटी | १० |
| १६ | दयेचा सागर तू असूनी | ११ |
| १७ | खोवूनी जीवनाला, वाईट | ११ |
| १८ | पतिवीन देव नाही ग | १२ |
| १९ | दोन दिवसाचे जीवन तुझे | १३ |
| २० | मन कळवळते नैनी पाणी | १३ |
| २१ | असे कसे बोलता | १४ |
| २२ | पति वचनाचा विश्वास | १५ |
| २३ | सांगावे गाऱ्हाणे कुणा | १५ |
| २४ | लागला छंद तुझ्या भक्तीचा | १६ |
| २५ | कधि येशील यमुने तीरी | १७ |
| २६ | कळतनाही रे | १७ |
| २७ | मज कोण दावील निजधान | १८ |
| २८ | पाहूनू पाप हे ओझ | १८ |
| २९ | आता तरी दया करा काही | १९ |
| ३० | ससारी येऊनी जीव हा | २० |
| ३१ | जन्मो जन्मी वाहीला भार | २१ |
| ३२ | घ कडेसी मज सदगुरुनाथा | २१ |
| ३३ | दुःख होते मना पाहूनिया | २२ |
| ३४ | मनाच्या वशात रहणारा | २३ |
| ३५ | देह जळले नीह विकारे | २३ |
| ३६ | येई माझ्या तुम्ही सद्गुरु | २४ |
| ३७ | दान अनाथा दीनदयाळा | २४ |
| ३८ | देव दयाळा धाऊ नयारे | २५ |
| ३९ | बोलविंतो माझा देव देव मला | २६ |
| ४० | माझे सुख दःख कानी | २६ |
| ४१ | गुरु देवा दया करारे | २७ |
| ४२ | ठेवला सतावरी विश्वास | २८ |
| ४३ | का करतो रे अभिमान | २९ |
| ४४ | त्याग तंबाखु गांजा | २९ |
| ४५ | वाईट तरी म्हणावे काय | ३० |
| ४६ | व्हारे व्हा जागृत व्हा | ३१ |
| ४७ | जरी सुख मार्ग बघतोसी | ३१ |
| ४८ | गेली वेळ पुन्हा न मिळे | ३२ |
| ४९ | चहाडी चुगलींत कुसा | ३३ |
| ५० | पांडूरंगा तुजविण मज | ३३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५१ | खेळ प्रभु कैसा रचिला | ३४ | ६१ | मी पाहीन तुला जीकडे | ४१ |
| ५२ | मित्रा कोण कुणाचे | ३५ | ६२ | ऐंक पार्वती नंदना | ४२ |
| ५३ | पतिव्रता नेम, मनी हा | ३५ | ६३ | भजन तू आवडीने गातो | ४३ |
| ५४ | लोपले ज्ञान जगी फार | ३६ | ६४ | गरीबाच्या देवा तू | ४३ |
| ५५ | आम्हा सांडूनि गेले | ३७ | ६५ | लाभला जन्म हा | ४४ |
| ५६ | तुजविण चैन ना | ३८ | ६६ | या भोळे पणाचा फायदा | ४५ |
| ५७ | काम नाही राम नाही | ३९ | ६७ | पांडूरंगा देवा तुला | ४५ |
| ५८ | दुनिया दुःखी जीवा | ३९ | ६८ | पाहण्या जागी निघालो | ४६ |
| ५९ | गज्या तू ऐक हे | ४० | ६९ | पाहण्या जगी निघालो | ४७ |
| ६० | स्वस्थ कसे बनले | ४० | ७० | (आरती) | ४८ |



श्री संत जैरामदास उर्फ लहरीबाबा

## भजन क्र. १ (ऐक माझी तव विनवनी...)

(चाल- चाहूँगा मै तुझे सांझ सबेरे)

ऐक माझी तव विनवनी, सरस्वतीच्या गजानना
भवबंध तोडी माझे ॥ धृ ॥

आलो शरण, आस घेऊन ।
देई सांत्वना, करी विघ्न दुर ना।
आहे मी दास तुवा ॥ १ ॥

भक्तिहीन, बुद्धीहीन ।
शक्तिहीन, मी अज्ञान।
गजानन, ऐक प्रार्थना
अपराध घेई पोटी ॥ २ ॥

कुणी जरी, स्मरण करी ।
तत्क्षणी, क्लेश हरी।
घेऊनिया, माझी दया।
कृपा करी नाथा ॥३ ॥

प्रथम पुजी देवगणा।
ऋषी मुनी आले शरण।
लम्बोधरा, कृपा करा।
रिद्धी-सिद्धी चालका ॥ ४ ॥

मन विटले, मायापायी ।
काय करु, सुचेना काही ।
म्हणे जैराम करी सिद्ध काम,
कानी घे माझी करुणा ॥ ५ ॥

## भजन क्र. २ (हरी तू बैस ना नयनी...)

(चाल - निघू दे दिवस मंगल तो)

हरी तू बैस ना नयनी, तेंव्हा सुटेल विषय मोहनी।
लावी तूं आपुले ध्यानी, ऐक ही माझी विनवणी ॥ धृ ॥

देवा तू पापाची वाट, नको दाखवू मम डोळा।
करी तू त्याहूनी आंधळा, तेने मिळे जिवा सुख ॥ १ ॥

आड मार्गी हे पदं जाती, करी त्याची तू फजिती।
लावी तू आपले कामासी, ऐक तू माझी गऱ्हाणी ॥ २ ॥

जाती हे कान निंदेत, ठेवी करूनी तू बधीर।
अर्ज.आहे देवा तुजसी, हीच माझी रे मागणी ॥ ३ ॥

लागती हात ख़ोटे कामी, ठेवी तू त्याला तोडूनी।
म्हणे जैराम प्रार्थना, आहे ही कर जोडूनी ॥ ४ ॥

## भजन क्र. ३ (मना तू धर सूसंगति...)

(चाल - निघू दे दिवस मंगल तो)

मना तू धर सूसंगति, मिळेल तूला सद्‌गति।
नको फिरू रानीवनी, सोड तू वाईट मती ॥ धृ ॥

क्षण भंगुर सुखा करिता, धाव घेशी पुढे पुढे।
सोड या खोट्या चालीशी, नाही होणार तुझे भले ॥ १ ॥

धरी तू सुविचारी पंथ, हरी कामी राही नित्य।
मार्ग हा साधी रे साधी, भले निघेल तुझे यात ॥ २ ॥

आतातरी ऐक हे म्हणणे, कानी घे प्रभूचे गाणे।
सांगू किती म्हणे जैराम, प्रभुविन नाही विश्राम ॥ ३ ॥

## भजन क्र. ४ (देवा तुझ्या वाचूनी...)

(चाल - पावन पंतित के तूम)

देवा तुझ्या वाचूनी, नाही जगी कुणी रे ॥ धृ ॥

स्वार्थ हिताच्या साठी, म्हणसी हे माझे माझे।
अंती दिसे ना कुणी, नाही जगी कुणी रे ॥ १ ॥

ज्याचा मी संग धरला, त्यानेच दगा दिला।
उद्धार दिसेना कुणी, नाही जगी कुणी रे ॥ २ ॥

ध्रुव बाळासाठी, धाऊनी तू आलासी।
दर्शन दिले तू रानी, नाही जगी कुणी रे ॥ ३ ॥

किती पतित वाल्या, उद्धार त्याचा केला।
त्यासी लाविले ध्यानी, नाही जगी कुणी रे ॥ ४ ॥

जन्म व्यर्थ तू दिला, मायात भूलविला।
सूचेना कांही मनी, नाही जगी कुणी रे ॥ ५ ॥

बघतो मी चौ दिशास, पाहण्या तुझे स्वरूप।
दिसला न मम नयनी, नाही जगी कुणी रे ॥ ६ ॥

बहु शास्त्र पठन केले, मंदिरी ध्यान धरले।
तू दिसला न चक्रपाणी, नाही जगी कुणी रे ॥ ७ ॥

जैराम म्हणे दयाळा, पामरा पदरी धरा।
घे किव आता कानी, नाही जगी कुणी रे ॥ ८ ॥

## भजन क्र. ५ (खोटा नाटा जरी जाल...)

(चाल - ये मेरा प्रेम पत्र पढकर)

खोटा नाटा जरी जाल, कोणावरी तु रे टाकसी।
भोगशील याचे तू फळ; पुढे तुला रे चौऱ्याशी ॥ धृ ॥

नको छळू कुण्या जीवा, नाही रे यांत भलाई।
प्राण्या विचार करी पुढला, पडशी नरकाच्या खाई।

सोड तू खोटा हा मार्ग, लाग तू प्रभू भजनासी ॥ १ ॥

चहाडी चुगली मध्ये रे, वेळ हा व्यर्थ खोविला।
करणे होते केले नाही, व्यर्थ चाळा हा मांडिला।
सांगूनी थोरपणा आपुला चातूर तू म्हणसी स्वतःशी ॥ २ ॥

लुटूनी धन द्रव्य दुसऱ्याचे, फजिती केली रे तूने।
त्राही त्राही होवूनी सारे, रडती तुझ्या नावाने।
दया माही तुझे जवळी, असा का निष्ठुर झालाशी ॥ ३ ॥

म्हणे जयराम जे काही, केले आजवरी तुने।
आतातरी सोड चाल, नाही तर होतील बेहाल।
वाईट हा त्यागूनी छंद, लाग तू सत् कार्याशी ॥ ४ ॥

## भजन क्र. ६ (यशोदा तुझा कान्हा...)

(चाल - सावन का महिना पवन करे सोर)

यशोदा तुझा कान्हा, मोठा ग हटखोर।
करतो हा धिंगाने, बाई आम्हा वाटेवर ॥ धृ ॥

मथुरेच्या बाजारी, नेहमी आम्ही जातो।
आम्हा पाहुनिया, छेडी आमची करतो।
लुटूनिया दही, फोडितो हा घागर ॥ १ ॥

सौंगळी घेऊनी, जाई यमुनेच्या तीरी।
कदंबाच्या झाडावर, वाजवितो पाई।
पाहुनी सुना डाव, बनतो हो सिरजोर ॥ २ ॥

रात्रीला येऊनी कधी, गुरे सोडून देतो।
लपुनी या शिंक्यावरचे, दही लोणी खातो।
झाली परेशान, पाहुन त्याची खोड ॥ ३ ॥

अग बाई आम्ही असू, परायाच्या सुना।
नाही याला धाक कांही, करितो धिंगाना।
आंघोळ करतांना, वस्त्र, नेई झाडावर ॥ ४ ॥

असे याचे गाऱ्हाणे, सांगू तुला किती।
समजावून सांगा तुम्ही, आपुल्या मुलासी।
सांगे जैराम, कृष्ण लिला ही अपार ॥५॥

---

## भजन क्र. ७ (धैर्य सोडू नको मना...)

(चाल - बहारो फुल बरसाओ)

---

धैर्य सोडू नको मना, जोवरी जीव आहे तना।
जोवरी जीव आहे तना॥ धु॥

रूठले जग मम प्रती, ठेवू नको त्याची भिती।
सत्य हे कार्य करण्याशी, ठेवू नको ती कल्पना।
ठेवू नको ती कल्पना ॥ १॥

सुख दु:ख आमचे हे, असती जिवना सोबती।
कसा चिंतातूर झालीसी, कसे होईल रे तरना।
कसे होईल रे तरना॥ २॥

वेड्या सारिखे का चालावे, हिताशी का रे नाडावे।
कशी आहे तुझी सवय, सोड सारी रे भ्रमना।
सोड सारी रे भ्रमना ॥ ३॥

बघुनिया सत्य मार्गास, तसे तवा चालण्या भास।
म्हणे जयरामं सोडी तू, वाईट सारी वासना।
वाईट सारी वासना ॥ ४॥

---

## भजन क्र. ८ (आम्हा सोडूनी कुठे...)

(चाल - हमे छोडकर तुम ना जावो कन्हैया)

---

आम्हा सोडूनी कुठे जातो तू हरी।
तुजवाचुनिया कोण साह्य करी॥ धृ॥

तुच जिवनाचा आहे जिवलग।
निष्ठूर झाला मथूरा त्यागून॥
वाजविल कोण, बाँसरी बाँसरी॥ १॥

तुजविन स्थिर नाही माझे मन।
कसे धैर्य धरू सूचेना मज॥
भेट कधी देसी, मुरारी मुरारी॥ २॥

कदंब झाडावरी, यमुनेच्या तीरी।
खेळ खेळीतो कालिया डोहावरी॥
यशोदा माता, आरोळ्या मारा मारी॥ ३॥

दुधाच्या घागरी घेऊन शिरावर।
विटंबना करी आम्हा वाटेवर।
लपुनी फोडसी, घागरी घागरी॥ ४॥

जैरामदास म्हणे प्रभू तूझा माझा।
संबंध आहे अनंत जन्माचा।
तुच एक माझा कैवारी कैवारी॥ ५॥

---

## भजन क्र. ९ (प्रभू तुझा माझा...)

(चाल - सावन का महिना)

---

प्रभू तुझा माझा कैसा हा वैर भाव
दुःखाचे डोंगर कळत नाही ठाव ॥ धृ॥

रचला हा खेळ कैसा कळेना कांही।
घडी घडी मन बिघडे ममते पायी।
धरावे कसे धैर्य, मार्ग मज तूं दाव ॥ १॥

एकांती जाऊन बसलो, लाविले मी ध्यान।
फिरविली माळातरी, लागे नाही मन।
चित्त हे उदास, नाही लागे भाव ॥ २॥

आम्हां पामरासी कळत नाही मर्म।
जयरामदास म्हणे दावी मज वर्म।
सर्वांचा तू वाली, समदर्शी तुझे नांव ॥ ३॥

## भजन क्र. १० (शिवभवानी राणी...)

(चाल - सावन का महिना पवन करे सोर)

शिवभवानी राणी, दक्षाची तू ग पोर।
जोडी रे जैसी शोभे जणूं, चंद्राची ती कोर ॥ धृ ॥

नारदमूनी सांगून गेले हिमालयासी।
देवू नको कन्यां तू-शिव भोळ्याशी।
भूताचा तो नाथ, राही कैलासाचे वर ॥ १ ॥

वरावे विष्णूशी, उदय होतील भाग।
ऐकोनिया गोष्टी उमा आला राग।
निघाली सखी संगे, वनी ती घनघोर ॥ २ ॥

आसन मुद्रा लावूनी, धरोनिया ध्यान।
ब्राह्मण रूप घेऊनिया, आले भगवान।
कसोटी घेऊन शंकर, झाले ते साक्षात्कार ॥ ३ ॥

पति प्राप्त करण्या, तपश्चर्या केली।
वरदान घेऊनी, घरी परत आली।
ईच्छा पूर्ण झाली, मिळाले चित्तचोर ॥ ४ ॥

शिव उमा-कथा नित्य पाठकरी।
जैरामदास म्हणे चुकेल ती फेरी।
करा मनी विचार, तेंव्हा होईल उद्धार ॥ ५ ॥

## भजन क्र. ११ (तुजविन दुःख देवा...)

(चाल-सारी सारी रात तेरी)

तुजविन दुःख देवा, सांगू कुणापासी।
अंती नाही कोणी देवा दुःख ऐकण्याशी ॥ धृ ॥

क्षणोक्षणी मन माझे जाई विषयात।
ममतेचे पायी टाकी बंधनात।
सुचत नाही काही, जाऊ कुणा पाशी ॥ १ ॥

मला वाटते देवा, तुझ्या नादी रहावे।
सुख दुःखाचे तुला, गाऱ्हाणे सांगावे ॥
दैव आहे मोठे, कर्म नेती लयाशी ॥ २ ॥

प्रपंच चालविण्या केली मी नोकरी।
त्या मध्ये दुःख फार, झाली फजिती।
तुझे वेड लागले देवा, घ्यावे चरणाशी ॥ ३ ॥

इथे तरी देवा जीवा मोठ्या वाटाघाटी।
विद्रोही मन पाडी तुझ्या नामी तुटी।
कसे काय करावे, सूचेना मनाशी ॥ ४ ॥

जर्जर झाले माझे जीव गांजताना।
कंठ भरून येते देवा तुज सांगताना।
ठाव देई जैराम म्हणे, माझ्या करूणेशी ॥ ५ ॥

---

## भजन क्र. १२ (सोडली लाज हरी पायी...)

(चाल - गेला हरी कुण्या गावा)

---

सोडली लाज हरी पायी, जन ते म्हणो मज कांही।
सुचेना हरी विना कांही, तो सावळा जिवाचा जिव्हाळा ॥ धृ ॥

झालो त्याचा मी वेडा, विषयाचा बांधून गाठोडा।
बघण्या पंढरीचा भोळा, तो सावळा जिवाचा जिव्हाळा ॥ १ ॥

विटले मन हे संसारी, जिवाला चैन न क्षणभरी।
मिळेल केव्हा श्रीहरी, तो घननीळा, जिवाचा जिव्हाळा ॥ २ ॥

मनी लागली हुरहुर, कसा होई माझा उद्धार।
अहर्निश लागली तळमळ, त्या गोपाळा जिवाचा जिव्हाळा ॥ ३ ॥

येवो किती तरी संकट, धरीन भाव बळकट।
कधीना सुटो ती वाट, अर्ज द्याला जिवाचा जिव्हाळा ॥ ४ ॥

जयराम म्हणे पंढरीराया, आतातरी करा कांही दया।
नाहीतर ब्रीद जाते वाया, तुम्ही सांभाळा जिवाचा जिव्हाळा ॥ ५ ॥

## भजन क्र. १३ (पाहू चला हरी भोळा...)

(चाल - गेला हरी कुण्या गावा)

पाहू चला हरी भोळा, सुख नाही या जिवाला।
जन्म व्यर्थ खोविला, येऊनी सार्थक नाही झाला ॥ धृ ॥

धनद्रव्य जरी असले, त्यानी सुखी कोण झाले।
दु:खाचे ओझे हाती आले, म्या गोपाळा ॥ १ ॥

लटक्या मायेच्या पायी, सुखी झाले कुणी नाही।
शेवटी चौऱ्याशीची पाळी, भजू गोपाळा ॥ २ ॥

माता पिता बंधू बहिण, दुर राहे ती कामीन।
कुडीतून निघतांना जिव, संग कोणीना ॥ ३ ॥

जग हा क्षणीक बाजार, मिळेना काही यांत सार।
पुढे उभा असे काळ, नियमानी चाला ॥ ४ ॥

अहो भाग्य हे आमुचे, पदरी पूण्य पूर्वीचे।
पाहण्या स्वरूप देवाचे, मिळवा देवाला ॥ ५ ॥

लावू नका वेळ इथे, गेली वेळ नये हाते।
जयराम तुम्हां सांगते, जपा नामाला ॥ ६ ॥

## भजन क्र. १४ (चुगली चहाडीत हुशार बनतो...)

(चाल - सपने सुहाने लड़क पनके बतीया)

चुगली चहाडीत हुशार बनतो, पण काम कराया आळस करतो ॥ धृ ॥

जेव्हा कामाची पाळी येई, कंटाळा मनी हा घेई।
या आळसाचे पायी, मूल बाळ उपाशी राही।
काम करायला लाज वाटते,
म्हणून गावात फिरत असतो ॥ १ ॥

सवय पडली खोटी याला, दारू गांजात मग्न हा झाला
सौंगड्याचा जमवूनी मेळा, खोवितो हा अब्रूला।
मनी कांही विचार न करतो,
वाटेल तसा कुकर्म करित असतो ।। २ ।।

पुढे आली गरीबी फार, अन्न वस्त्राने झाला बेजार।
वडीलाचे होते घरदार, विकून झालासे कंगाल।
दीनदुबळ्यांशी लबाडी करतो,
जिवन मोलाचे खोवित असतो ।। ३ ।।

जर्जर झाले याचे जीवन, राहिला नाही कुठे मान।
फिरतो वेडा पिसा होवून, कामी राम गेला विसरून।
वाईट कर्माचे असे फळ मिळते,
जयराम कळकळीने तुला सांगतो ।। ४ ।।

---

## भजन क्र. १५ (टाकलास कुणाच्या पोटी...)

(चाल - लागला रंग भजनाचा)

---

टाकलास कुणाच्या पोटी, पाहण्या देवा कसोटी ।। धृ ।।

पडली ही आटी भेटीची, विसर पडली तुझ्या नामाची।
झाली ही जिवनाची माती ।। १ ।।

अहर्निशी कामात ध्यान, कसे करू तुझे भजन।
मनाला शांती ना थोडी ।। २ ।।

उठून सकाळी शेतावरी, औत घेऊन खांद्यावरी।
कामाने पडली ही तुटी ।। ३ ।।

नाही बुद्धी नाही ते ज्ञान, केले नाही शास्त्राचे पठण।
दया भाव नाहीं ते पोटी ।। ४ ।।

बैल जूं घेतली तुतारी, टोचूनी दया न तिळभरी।
निर्दयी हाकी काठी ।। ५ ।।

येऊन जन्मा हित नाही केले, प्रपंचात जीवन सारे गेले।
मम अंगी वासना मोठी ॥ ६ ॥

जैराम म्हणे पोटाचे दास, केली नाही विठू तुझी आस।
पामरावर ठेवी दृष्टी ॥ ७ ॥

---

## भजन क्र. १६ (दयेचा सागर तूं असूनी...)

(चाल - अगर है ग्यानको पाना)

---

दयेचा सागर तूं असूनी, असा निष्ठूर कां झाला।
एकदा दे दर्शन तू हीन या अतित पतिताला ॥ धृ ॥

किती अपराध हे माझे, अनंत जन्माचे ओझे।
आता मिळाली ही संधी, कृपा करी दीन दासाला ॥ १ ॥

पूर्वी पूण्य फळा आले, म्हणू नरदेह मिळाले।
असे माझे अहो भाग्य, विसरना पडो जिवाला ॥ २ ॥

असंख्य जन्माचे फेरे, फिरून आलो मी माघारा।
कितीतरी दु:ख मज झाले, विसरलो तुझ्या नामाला ॥ ३ ॥

मी तू पण भरले मम अंगी, आड हे येती सतसंगी।
सोडूनी सर्व ही भ्रांती, नेई मज निजधामाला ॥ ४ ॥

म्हणे जयराम विसर पडली, दावावी वाट ती मजला।
नित्य येई स्मरण तुझे, तेणे होई सुगति अधमाला ॥ ५ ॥

---

## भजन क्र. १७ (खोऊनी जीवनाला...)

(चाल - दो दिवाने दिलके)

---

खोऊनी जीवनाला, वाईट संगती गेला।
विसरला, विसरला विसरला प्रभुनाम ॥ धृ ॥

धनद्रव्याचा गर्व करोनी,
मानवनीती सर्व सोडूनी।
कितीतरी लुटती, गरीबासी कष्ट देती ॥ १ ॥

कर्ज काढूनी शेती विकता,
दारू पिऊनी उपाशी राहता।
रोगाने बेजार होती, तारूण्यपणी रडती ॥ २ ॥

संगती पायी मती भ्रष्टली,
आयुष्य निघाले काया क्षिणली।
वाचवी तू आता, पंढरीच्या नाथा ॥ ३ ॥

वाचवी आता गुरूमाऊली,
सदा कृपेची करी सावली।
सांगतो जैराम, करी नेक काम ॥ ४ ॥

---

## भजन क्र. १८ (पतीविण देव नाही ग तुला...)

(चाल-ज्योत से ज्योत)

---

पतीविण देव नाही ग तुला, जाग तू बाई संत वचनाला ॥ धृ ॥

नीति नियमाने जी वागेल, सार्थक साधील आपूले।
उद्यास येतील तिचे भाग्य, देवा करूनी आपूले ॥
त्रिलोक्यांत उणे नाही तिला ॥ १ ॥

पतीविण जिणे हे तुझे, व्यर्थ आहे संसारी।
दृढभाव हृदयी धरूनी, प्रपंच परमार्थ करी।
हातीकाम मुखी नाम घेई नामाला ॥ २ ॥

पति असे देवाचा देव, तोच तुझा कैवारी।
शंका मनी ठेवू नको ग, नित्य सेवा त्या करी ॥
विसरू नको तू या नियमाला ॥ ३ ॥

हृदयी ठेवी पतिचे ध्यान, सर्व जिवा करी दया।
भूलूं नको ग गर्व धरूनी, सर्व ठगनी ही माया।
आचरावे मार्ग असा मान किर्तिला ॥ ४ ॥

पति तुझा आहे मित्र, पति हा तुझे ग गणगोत्र।
तोच तुझा तो आहे सूत्र, तोच तो शिर छत्र॥
बंधूत्व पाही परपुरूषाला ॥५॥

प्राण वाचविले पति देवाचे, पहा त्या सावित्रीने।
पाळून नियम ते हृदयी, अमर नांव केले।
म्हणे जयराम साध त्या हिताला ॥६॥

---

## भजन क्र. १९ (दोन दिवसाचे जीवन...)

(चाल - ज्ञान बडाईसे बढकर)

---

दोन दिवसाचे जीवन तुझे, माझे माझे का म्हणसी रे।
काळ बां तुला येऊन नेईल, मग का करसी तळमळ ॥धृ॥

महाल अटारी अन् द्रव्य हे, जिथल्या तिथे राहतील।
संग तुझ्या या कुणी ना येती, जे करशील ते भरसी रे ॥१॥

काचेप्रमाणे तुझी काया, याचा भरवसा का करशी।
पलघडीचा भरवसा नाही, उगाच बडबड का करशी॥
खोऊ नको तू या संधिला, जीवन व्यर्थ का करशी ॥२॥

कुणी कुणाचा मित्र ना गड्या, कोण कुणाचा शत्रु रे।
स्वार्थ हिताची गोडी लावून, भ्रमन्यात त्वां टाकती रे॥
म्हणे जयराम आल्या जन्माचे, स्वहीत का भूलसी रे ॥३॥

---

## भजन क्र. २० (मन कळवळते नयनी...)

(चाल - मन डोले मेरा तन डोले)

---

मन कळवळते नयनी पाणी येते, पाहून गरिबांची गंती।
तू कांही तरी लाव सोय यांची॥ धृ॥

अन्न वस्त्रांनी भटकत फिरसी, चिंतातूर होऊनी।
त्राही त्राही झाले हे जन, पाहती केंवीलवाणी॥
धाऊनी यावे, रक्षा करावे, तू ऐक कीव दीनांची॥ १॥

दीन दुबळ्यांची दैना न ऐकी, देवा तुज वाचूनी।
धनद्रव्य ज्याचे जवळी असती, देती न मुठभर दानी॥
ज्ञान बुद्धी देण्या, भू वर तुम्ही यांना, तेंव्हा होई शांती जीवाची॥ २॥

मती भ्रष्टली नीती गेली, द्वेष भाव वाढला।
जिकडे पहावे तिकडे देवा, विद्रोह उमडला।
तू धाव चक्रपाणी, ऐक गाऱ्हानी, किव घेई दीनांची॥ ३॥

गुंडागिरी लबाडखोरी, अती वाढली व्यभिचारी।
जयराम म्हणे देवा तू रे, धावत यावे श्री हरी।
लवकर यावे, कृपा करावे, भवपाश तोडण्यासी॥ ४॥

---

## भजन क्र. २१ (असे कसे बोलता...)

(चाल - दो दिवाने दिलके)

---

असे कसे बोलता व असे कसे चालता।
चलाना-चलाना, धरावी ती वाट॥ धृ॥

सत् मार्गाचा उपदेश देशी, जनांसी तू ब्रम्ह ज्ञान सांगसी।
अंगी नाही ज्ञान, तू कोरडा पाषाण॥ १॥

भजन किर्तन डोलाने करसी, दया धर्माकडे लक्ष न देशी।
कसा तुझा धर्म, आणि कसे तुझे कर्म॥ २॥

जना करी उपदेश विश्वास देऊनी, निघून जासी त्यांना फसवूनी।
आलासी बैमान, राहणार नाही मान॥ ३॥

जैरामदास म्हणे प्रेम भावाचा, चालावी तैसी वदावी वाचा।
घरी सत्यकाम, मिळेल घनश्याम॥ ४॥

## भजन क्र. २२ (पति वचनाचा विश्वास...)

(चाल - मैं क्या करू राम मुझे बुढा)

पति वचनाचा विश्वास, नाही ग जिला ॥ धृ ॥

जन्म व्यर्थ खोविला संसारी येऊन।
भूमिभार झाली, जन्म ही घेऊन॥
पाळले नाही कधी तिने, पति आज्ञेला ॥ १ ॥

बोलतसे एक व करितसे दुजे।
पापाचे ते डोक्यावरी घेतसे ओझे॥
वाडवडिलांचा काही ग मान न तिला ॥ २ ॥

पति आधि सांगे शहाणपण थोर।
पुढल्या जन्मी होईल ती घार॥
जागा तुम्ही बाई या संत वचनाला ॥ ३ ॥

जैरामदास म्हणे अशा या बाईला।
यमपुरी मिळतसे नर्क वास तिला॥
त्यागा कूमार्गासी तूम्ही, सत्त्यानी चाला ॥ ४ ॥

## भजन क्र. २३ (सांगावे गऱ्हाणे कुणा...)

(चाल - तू प्यार का सागर है)

सांगावे गऱ्हाणे कुणा, तुज वाचून रे मन मोहना।
रचला हा खेळ तूने, ऐक ही सूख दुःख करूणा ॥ धृ ॥

जन्म जन्माचा दुःखी मी देवा, कोण करी सांभाळ।
दिसेना अंति कोणि हरि रे, करण्या भवसिंधू पार॥
ही वेळ निघत चालली, कोण देई सांत्वना ॥ १ ॥

स्वार्थ हितासाठी गण्गगोत्र, टाकीतसे जाळा।
प्रित लावुनी माया ही मोहनी, भुलवित असे संसारी।
लावुनिया आपुली गोडी, जर्जर केले जीवना ॥ २ ॥

ध्यान लावूनी बसतो एकांती. फिरवित असे माळा।
धन पूत्र हे समोर येती, नेती मज माघारा॥
चित्त झाले हे उदास, नाही कुणी निदान ॥ ३ ॥

तुझविन ठेवू कोठे मी जीव, तरण्या हा संसार।
घेऊ कुणाचा आधार देवा, होण्यासी उद्धार॥
जयराम म्हणे सुखाचा, तुज वाचूनि गोविंदा ॥ ४ ॥

---

## भजन क्र. २४ (लागला छंद तुझ्या...)

(चाल- हमे तो लुटलिया)

---

लागला छंद तुझ्या भक्तिचा, भोळ्या या मुर्तिचा,
सावळ्या सुर्तिचा॥ धृ॥

तुझ्यासाठी म्या किती परेशान झालो।
दर दर मी किती भटकत फिरलो।
वेडा पिसा होऊन फिरत राहीलो।
रानी बनी पडून फिरु लागलो।
रंग लागला होता तुझ्या नादाचा॥ १ ॥

विद्रोही लोकांनी सारा माझा छळ केला।
मित्र सोबती म्हणती हा वेडा झाला॥
विश्वास न करती माझ्या या वाणीला।
हाकलून काढा म्हणती लुच्च्या चोराला॥
अशा स्थितीत काही माझा काळ गेला।
एक दिवस उगवला, तो सुवर्ण संधीचा॥ २ ॥

तुझ्या भक्तिने केले मजवर तुफान ।
अष्ट प्रहरी दिसे, तुझे स्वप्न ॥
पदरी होते कांही कांही पूर्वीचे पुण्य ।
गुरु रायाचे झाले मज दर्शन॥
जैराम म्हणे झाली मनो कामना पूर्ण ।
तुझा माझा संग राहो जन्मो जन्मीचा॥ ३ ॥

## भजन क्र. २५ (कधि येशील यमुने...)

(चाल - कधी येशील मनमोहना)

कधि येशील यमुने तिरी, प्रभु ती घेऊनिया बाँसरी ॥ धृ॥

कैसा धर्म बुडत चालला, लहान मानी ना थोराला।
हा धर्म जातो लयाला, काय सांगावे कुणाला।
तू धावत ये झडकरी॥ १ ॥

गाई गुरे आरोळ्या देती, कुठे गेला आमचा अधिपती।
मति भ्रष्ट झाली लोकांची, काय सांगावे कुणाशी।
तू वाचविण्या ये हरी॥ २ ॥

दारु जूव्याचा व्यवहार वाढला, लोक प्रोत्साहन देती त्याला।
भजनाचा लोप हा झाला, हांसती नास्तिक आस्तीकाला।
किती अंत पाहसी हरी॥ ३ ॥

पतिव्रतास अन्न ना मिळे, वेश्या खाती जलेबी पेढे।
देती लक्ष न धर्माकडे, चिंतेत फिरती चहुँकडे।
जयराम म्हणे वाचवी हरी॥ ४ ॥

## भजन क्र. २६ (कळत नाही रे प्रपंच...)

(चाल - बार बार तोहे क्या)

कळत नाही रे प्रपंच व्यवहार, म्हणतो मी हुशियार।
कसा यासी घडेल, परमार्थ व्यवहार॥ धृ॥

काम धंद्याचा येतो याला कंटाळा।
भोळ्यांना पाहूनि टाकितसे जाळ।
व्यर्थ बसून गप्पा मारी, सांगे शहाणपणा फार॥ १ ॥

सदा राही दुर्व्यसनाच्या नांदात।
नित्य ठेवी द्वेश भावना मनात।
कर्म धर्म विसरूनी सारे, खोविले आयुष्य बेकार ॥ २ ॥

गोड गोड हा बोलतसे वरपांगी।
दुर्गुणांचा मळ असे सदा अंगी।
मुखी घेऊनी रामनाम, करी खोटे व्यवहार ॥ ३ ॥

इंद्रिया जिंकून मना करावे स्थिर।
प्रपंच परमार्थाचा करावे विचार।
जैरामदास सांगे तुम्हां, सुमार्गाने व्हाल पार ॥ ४ ॥

---

## भजन क्र. २७ (मज कोण दावील ...)

(चाल -लपवूनी ठेवसी काय राधिके)

---

मज कोण दावील निजधाम गुरुराया।
तुजविन जिवा नाही विश्राम गुरुराया ॥ धृ ॥

मद मत्सर हे अडवून बसले, सत्य मार्गात भंग पाडिले।
तरणे कसे होईल घनश्याम ॥ १ ॥

सांगु मी दुःख तुजविण कोणा, तारण्या संसारी कोणी दिसेना।
कोण दाविल मोक्षधाम ॥ २ ॥

काम क्रोध हे पहाड मोठे, तुझ्या गांवाच्या मार्गी काटे ।
याने झालो मी परेशान ॥३ ॥

विघ्न नाशक हे तुझे, हरला किती पतित ओझे ।
जयरामासी दावी निजधाम ॥ ४ ॥

---

## भजन क्र. २८ (पाहूनी पाप हे ओझ...)

(चाल - काय सांगु ती देवाची मात)

---

पाहूनी पाप हे ओझ, मन झुरनीत पडले माझे।
संता वाचून कुणा सांगू गाऱ्हाणे ॥ धृ ॥

एका बाजूसी गुंड्याचा जोर, ज्याची कमाई तो बनतो चोर।
ऐसी आली आहे वेळ ॥ १ ॥

घूस- खोरी लबाडखोरी, वाढली आहे जगी व्यभिचारी
सोडली मानवतेची चाल ॥ २ ॥

पतिव्रताचे झाले बेहाल, वेश्या झाली मालोमाल।
यांत स्वार्थी बनला दलाल ॥ ३ ॥

मानव झाला हा दानव, धर्म नीति नाही त्याचे सवे।
म्हणून देश झाला कंगाल।।४॥

गळ्यांत घालुनिया माळा, लावी कपाळी चंदन टिळा।
कापी गळा भजी मुखी राम ॥ ५ ॥

म्हणे जैराम बुडतो हा धर्म, सोडले मानवतेचे कर्म।
जगी पडला आहे अंधार ॥ ६ ॥

---

## भजन क्र. २९ (आतातरी दया करा...)

(चाल- दिलमन से गाऊ मै तेरा भजन)

---

आतातरी दया करा काही तिळभरी।
धावत यावे पांडूरंगा साडून पंढरी ॥ धृ ॥

अति हिन मति हीन बुद्धी हिन देवा,
घडली नाही जन्म घेऊनी तुझी काही सेवा।
रंगली नाही नामी तुझ्या, वाचा वैखरी ॥१ ॥

मन हे फिरवितसे मला चौदिशा।
जिकडे पाहावे तिकडे मोह दुःख निराशा।
ठेवली आशा आता, देवा तुजवरी ॥ २ ॥

काम क्रोध लोभ मोह गाजती वरचेवरी।
संग घेतला मित्र सोबत्याचा पळती दुरचेदुरी।
संकट काळी कोणी न होती, तुजविन कैवांरी ॥ ३ ॥

घेतली होती आस देवा, तुझ्या भेटीसाठी।
दरी खोरी भटकिलो, कुठे भेटेल जगजेठी।
लपूनी बसला कुठे देवा कर दया दिनावरी ॥ ४ ॥

जयराम म्हणे असा का निष्ठुर झाला।
जात आहे लाज आता, रक्षी विठ्ठला।
अंत नको पाहू माझे, येई गरूड सवारी ॥ ५ ॥

---

## भजन क्र. ३० (संसारी येऊनी, जीव हा...)

(चाल - विश्वची घर भासूनी)

---

संसारी येऊनी, जीव हा पडतो मायेत, राहतो सदा अज्ञानात।
असा हा सोडूनी स्वहित ॥ धृ ॥

लोभाची गती, आशा फिरविते अष्ट प्रहरी।
बांधते अपुल्या बंधनात ॥ १ ॥

ओढाळ वासना ही, नेते सदा पाय डोही।
दाखवी अपुलाची रंग ॥ २ ॥

संसाराच्या फेऱ्यात, ठेवते सदा अहं भावात।
करतसे आयुष्याचा घात ॥ ३ ॥

संधि मोलाची, नको खोऊ तूं सर्वची।
आधि जा गुरूच्या शरणात ॥ ४ ॥

सांगे जयराम, करूण घे संतसमागम।
तेंव्हा होईल हा जीव मुक्त ॥ ५ ॥

## भजन क्र. ३१ (जन्मो जन्मी वाहीला...)

(चाल- दो हंसो का जोडा)

जन्मो जन्मी वाहीला भार कुटूंबाचा।
रंगली नाही रामा तुझ्या नामी ही वाचा॥ धृ॥

भुल पडली देवा बघुन थयथयाट मायेचा।
लपवित तुज नितनवा साज हाट मायेचा।
स्वस्थळी कधी जाईन ती चिंता मला।
एकदा दे दर्शन अनंता मला॥
आपला सा करून घे, या दिन अनाथा॥ १॥

स्थिर राहू देत नाही, मोह या मना।
सम पाहू देत नाही, दोह या जना।
लीन झाली काया या विषय वासना।
बेफाम झालो देवा, या तुझ्या ध्यासना॥
सफल तरी करसील का, मानव जन्माचा॥ २॥

कैसा रचिला खेळ, काळ वाट पाहती।
सता तुझी असून ही कां परका पाहसी॥
सत्संगाला आळा धनद्वार घालते।
जाईल किती काळ असा, काही न सूचते॥
जन्मो जन्मी झालो लहरी, मुक्त करी मरणाच्या ॥ ३॥

## भजन क्र. ३२ (घे कडेसी मज सद्गुरू...)

(चाल - बैठे हे तेरा ध्यान लगाये)

घे कडेसी मज सद्गुरू नाथा।
बंध चौऱ्याशीचा तोड रे ॥ धृ॥

लई दिवसानी भेट झाली, दर्शन तू मज दिले माऊली।
मार्ग दाविला तू मज सोपा।
केले बहू उपकार॥ १॥

मार्ग चालता रूतले काटे, कठोर झाले अंगी उपराटे।
ऐसी संधी पाहता तूं।
कृपा केली फार ॥ २ ॥

संकटी कोणी नव्हते कैवारी, कुटूम्ब परिवार बनले वैरी।
तेंव्हा तू बापा धाऊनी आला।
दिला मजसी आधार ॥ ३ ॥

सावळे तुझे स्वरूप पाहून, माझ्या मनाला क्षण करमेन।
जयरामाची विनवणी तुजला।
पदोपदी मज सांभाळ ॥ ४ ॥

---

## भजन क्र. ३३ (दु:ख होते मना पाहूनियां...)

(चाल - बाळा होऊं कशी)

---

दु:ख होते मना पाहूनियां दु:खी जना, येते पानी नयना ॥ धृ ॥

दीन दुबळ्याचा कोणी न कैवारी, तुज वाचून श्रीहरी।
कुठे जाऊनी बसलासी, अन्नाविन किती उपवाशी राहती
वस्त्रेही न मिळती ॥ १ ॥

त्राही त्राही झाले सगळे, कोनासी तुझे मार्ग न कळे।
आठविती तुझे हे बाळे, येईल केव्हा मुरारी।
रंजल्या गांजल्याचा तूच वाली ॥ २ ॥

तुझ्या वाचूनी कोठे ठेऊ प्राण, दिसत नाही तुझे अस्थान।
त्याचे पासी जावे, तेच देती धिक्कारून।
आता काय करावे काही सुचेना ॥ ३ ॥

सांत्वना देण्या कोणी न जगी, जे मिळती ते सर्व ठगी।
कोणा शरण जाऊ, कोणाचे चरण पांहू ॥
तुज वाचून कोणी नाही अधार ॥ ४ ॥

अंत आमचे पाहू नकोरे जयरामाची घ्यावी कीव नयना।
तेने सुख होईल सर्व जीवा, हिच प्रार्थना तुला रे ॥ ५ ॥

## भजन क्र. ३४ (मनाच्या वशात राहणारा...)

(चाल - जरी सुख मार्ग बघतोसी)

मनाच्या वशात राहणारा, किती तरी असो विद्वान।
सफल ना होतसे जीवन, करी लाखो तो प्रयत्न ॥ धृ ॥

योग साधण्या करिता तो, जातसे साधूच्या शरणी।
मळ हे निघाले नाही, कैसा साधेल साधन ॥ १ ॥

सहा शास्त्र अठरा पुराण, जरी केले असे पठण।
भक्तीचे मर्म ना कळे, कसे होईल तरण ॥ २ ॥

अहर्निश जाऊन करतो, मंदिरी प्रेम देवपूजा।
मनी आहे दूजा भाव, कसे होईल दर्शन ॥ ३ ॥

मन हा तनाचा सरदार, करितसे चित्त बेकार।
त्याचे मागे चाले बुद्धी, आदि करा मन पूजन ॥ ४ ॥

म्हणे जयराम जो कुणी, मनाशी वशीभूत केला।
धन्य झाले ते भाग्य, येऊनी नर जन्माला ॥ ५ ॥

## भजन क्र. ३५ (देह जळले मोह...)

(चाल - देर भई प्रभू)

देह जळले मोह विकारे।
लागेल हे मायेचे वारे ॥ धृ ॥

कां तू माझे अंत बघसी, रूसला का तू दया न तुजसी।
मन फिरतो चौफेरे रे ॥ १ ॥

दिसती मला दुःखाच्या रासी, सांभाळी तू मज ऋषीकेशी।
निष्ठूर असा का बनला रे ॥ २ ॥

पाहतो जिकडे तिकडे अंधार, सद् गतिचा नाही उद्धार।
तुज वाचून खोटे सारे रे ॥ ३ ॥

हा देह पडो तुझ्या कामी, हेची मागने तुजसी स्वामी।
जैरामाची हीच मागणी रे ॥ ४ ॥

## भजन क्र. ३६ (येई माझ्या तुम्ही...)

(चाल - किती गोड तुझी मुरली कान्हा)

येई माझ्या तुम्ही सद्गुरूनाथा।
तुझ्या चरणी राहो हा नित्य माथा॥ धृ॥

बहू दिना अंति भेटी झाल्या।
पुण्य कर्माने तुम्ही मिळाल्या।
तुम्ही आमचे हती कती॥ १॥

नाव अडली आहे भवडोही।
धोका पडला आहे सर्व ठायी।
धावा धावा हो पंढरी नाथा॥ २॥

मद मत्सर हे जोर दाविती।
कूमार्गाच्या वाटे नेती।
तुजविन कोण साहयता॥ ३॥

दास जैरामची ही विनवणी।
कानी घ्यावे चक्रपाणी।
तुजविन नाही अंति दाता॥ ४॥

## भजन क्र. ३७ (दीन अनाथा दीन दयाळा...)

(चाल - नाच नाचूनी अति मी दमले)

दीन अनाथा दीन दयाळा, तारी तूच मला
असा का मजसी निष्ठुर झाला॥ धृ॥

जन्मासी येऊन पुण्य ना केले, दीन दुबळ्यास सेवेस मुकले
देव भक्तीही दूर राहिली, भ्रमाने संशयी जीव झाला॥ १॥

कुठवरी ठेऊ आपुला भाव, देह सार्थकी ठेवण्या स्थव।
सद्गुरू राया तुझ्यावाचूनी, ताराया नाही आधार मला॥ २॥

साधू संत पुराण संगती, गुरूभक्तिविण नाही सद्‌गति।
मी अधम तुजसी वंदितो, दयाळा दूर न लोटी मला ॥ ३ ॥

पतितांना उद्धारावया, भूवरि येसी तू गुरूराया।
तुझ्या कृपे सर्व होतसे, मग देई ज्ञान खूला ॥ ४ ॥

दीन दयेचा सागर अससी, ब्रिदजना ये तु सांभाळसी।
मग कां घेसी आडेवेडे, जयराम शरण तुला ॥ ५ ॥

---

## भजन क्र. ३८ (देव दयाळा धाऊनिया रे...)

(चाल - मन मंदिर मे श्रृंगार किया)

---

देव दयाळा धाऊनिया रे।
भक्तासी तू शरणी घे रे ॥ धृ ॥

कुठवरी भक्तांचा अंत पाहसी।
तुझ्या लिलेला कोणी ना पुरती।
मूर्ख अज्ञानासी तू शरणी घे ॥ १ ॥

सहस्त्र तुझे रूप अनोखे,
ऋषी मुनी ओळखू न सके।
त्यात माझी गणना कसी रे ॥ २ ॥

भटकत फिरलो किती या जन्मी।
तरी प्रयत्न ना आले कामी।
दीनावर दया का न करशी ॥ ३ ॥

होते पूर्वीचे पूण्य पदरी।
तेणे मिळाली मानव नगरी।
बापा दयाळा, कृपा तू करिसी ॥ ४ ॥

जयरामाची विनवनी तुला।
तुझी सेवा घडो जन्मोजन्मी मला।
मागनी आहे देवा तुजपाशी ॥ ५ ॥

## भजन क्र. ३९ (बोलवितो माझा देव...)

(चाल - ज्योत से ज्योत)

बोलवितो माझा देव मला।
भेटी घेण्या सर्व चलारे चला ॥ धृ॥

अंतर बाहेर आहे देव, खूण असे सद्गुरूची।
औट हाताच्या पंढरी जावून, भेटी घ्याहो विठूची।
तो सर्वा ठायी आहे ठसला॥ १ ॥

बिन पायानी भेटी जावे, ब्रिनवाचे गुण गावे।
बिन डोळ्यानी हरीसी पहावे, बिन हातानी पुष्प वहावे।
गुरूविण भेद न कुणा कळला॥ २ ॥

बिन पाण्याने यमुनेत न्हावे, बिन मुखानी अमृत प्यावे।
शुण्यावरी बसूनी आसनी, ते रूप नित्य बघावे।
जयराम अंति शोधियला ॥ ३ ॥

## भजन क्र. ४० (माझे सुख दुःख कानी...)

(चाल - कुणी मित्र कुणाचा नाही गड्या)

माझे सुख दुःख कानी घेशील कां ?
माझे संकट निवारण करशील कां ? ॥ धृ॥

माझ्या या चंचल मनाशी, सत् मार्ग तूं दावी हरी।
क्षीणलो मी मायेचे पायी, वाट ती सूचेना कांही।
या पामराला पदरी घेशील कां ॥ १ ॥

जन्मोजन्मीचा भुलला आहो, दे मज तुझे चरण।
या जगी मजला तारण्या, तुजविण दिसत नाही कोण।
तूं गरूड सवारी येशील कां ॥ २ ॥

तुजविन माझे अंति न कोणी, ऐकण्या ही गऱ्हाणी।
इथे मजला जे जे संगी मिळती, पडती धोका देऊनी।
माझ्या जीवाला शांतता देशील कां ॥ ३ ॥

ऐक ही अनाथाची प्रार्थना, यावे देवा तक्षणी।
निरखावे माझे हे क्षीण, पार करा या फाशातूनी।
ही अर्ज दयाळा ऐकशील का ॥ ४ ॥

ज्या ठिकाणी मन जाई, त्या ठिकाणी तुझे स्वरूप पाही।
हीच मागणी तुजशी देवा,या शिवाय मज नको कांही।
जयरामाशी हा वर देशील का ॥ ५ ॥

---

## भजन क्र. ४१ (गुरूदेव दया करि रे...)

(चाल - गुरूदेव दया कर दे हम ध्यान धरे तेरा)

---

गुरूदेव दया करि रे, मन लागो तुझे चरणी।
दासासीतू तारीरे ही माझी विनवनी ॥ धृ ॥

अवगून माझे कोटन कोटी घ्यावे तुम्ही निरखुनी।
बहू शिणलो मी इथे, शांतता नाही मनी ॥ १ ॥

अनंत जन्माचा दुःखी नाही कोणी ताखु।
दाखविण्या मार्ग, दिसेना जगी कोणी ॥ २ ॥

काही पूर्वीचे पुण्य, होते ते माझे पदरी।
म्हणूनी श्रीहरि रे, आलो मानव जन्मी ॥ ३ ॥

आतातरी दिनावरी कांही करी कृपा।
जेने होई जिव सूखी, हिच माझी मागणी ॥ ४ ॥

आहेस तू सर्वांचा, घट घट जाणणारा।
सांगू तूला मी कीती, ही सर्व तुझी लीला ॥ ५ ॥

जयराम म्हणे दयाळा, आता तुम्ही सांभाळा।
ही शेवटची विनवनी घ्यावे तुम्ही चक्रपाणी ॥ ६ ॥

## भजन क्र. ४२ (ठेवला संतावरी विश्वास...)

(चाल- हरी गेला कुण्या गावा)

ठेवला संतावरी विश्वास, तोडण्या भव बंधन पाश।
जगी सर्व पोटोबाचे दास, तारण्याला संता वाचून मला ॥धृ॥

केली संगत धनिकाची, माल गुजार सावकाराची ।
अंती केली फजिती, धोका यांनी दिला ।
काही सूचेना मला ॥१॥

धरला मित्राचा संग, येता कठीण प्रसंग।
पळती सोडूनी हे अंग, घात यानी केला ॥
विश्वास देऊन मला ॥२॥

आवडी मनी धन पुत्राची, हित करती स्वार्थासाठी ।
भुलविला याना जगजेठी, स्वार्थ निघाला ॥
कामा नाही आला ॥३॥

ते ते धोके बाज जगी ।
असती मायेचे भोगी, वाचून चाला ॥
नाही निघत भले ॥४॥

दिसे धोका सर्व ठायी, काळोबा टपून वाट पाही ।
सूचेना मनाला काही, भ्रमांत पडला ॥
जगी तारण्याला ॥५॥

कुणाचे वाईट संस्कार, घेता संताचा आधार ।
होतो जिवाचा उद्धार, जैरामाला ॥
विश्वास संताचा झाला ॥६॥

## भजन क्र. ४३ (का करतो रे अभिमान...)

(चाल - काहे भूलारे नादान)

का करतो रे अभिमान, सोडले धर्म नीतीचे ज्ञान ।
मुखी घे हरिराम, येईल तुझ्या तेरे काम ॥धृ॥

ही इमानदारी सर्व, तू खोऊनिया बसला ।
खोट्या नाट्या कामी, आहे तूरे रंगला ॥
जे करने ते केले नाही, आयुष्य गेले हराम ॥१॥

हे माझे माझे म्हणूनी, लागली विषय मोहनी ।
अंतकाळी तुला, कोण सोडील फाशातूनी ॥
कुटूम्ब परिवार मध्ये भूलला, नामाविण नाही विश्राम ॥२॥

जे जे मिळती तुला जगी, ते ते आहेत सर्व ठगी ।
स्वार्थ निघाल्यावरी, पळती दुरचे दूरी ॥
लटकी आहे सर्व माया, कोणी न पडती कामा ॥३॥

प्राण्या सावधान तु होई, जिवनाचा उद्धार करून घेई ।
जैराम म्हणे भूलु नको रे, विसरू नको सत काम ॥४॥

## भजन क्र. ४४ (त्याग तंबाखु गांजा ...)

(चाल - उडे जब जब जुलफे तेरी)

त्याग तंबाखु गांजा चुट्टा, रक्ताचा होतो तोटा ।
भल्या भल्यासी लागला बट्टा ।
अरे तू ऐक जरा, अरे तूं ऐक जरा हे सखिया ॥धृ॥

रोगाने स्वारी केली, त्याने स्वप्नी धातू गेली ।
औषधाची पाळी आली,
लागले व्यसन खोटे ॥१॥

कफ चैन पडू न देईना, मन क्षण मात्र न राहीना ।
कधी नाम मुखी तुज येईना,
लागला तुजला बट्टा ॥२॥

आता शिवू नको तू याला, नाही निघत यानी रे भला ।
सांगे जैराम समजावूनी तुजला,
जन करतील थट्टा ॥३॥

---

## भजन क्र. ४५ (वाईट तरी म्हणावे...)

(चाल - भैया मेरे राखीके)

---

वाईट तरी म्हणावे काय कुणाला ।
बघा शोधून आपल्याच हृदयाला ।
माझा मीच पाही जनाला जनाला ॥धृ॥

खोट्या या अज्ञानापायी, इंद्रियासी मन ओढूनी नेई ।
भुलवूनी ताब्यात अपुल्या घेई, ज्ञान अज्ञानी भ्रांती होई ।
सांगू किती या मनाला मनाला ॥१॥

षड्विकारे दाऊनी जोर, जाऊ न देती हे समोर ।
वासना ओढी अष्ट प्रहर, सत्य असत्याचा न मिळे सार ।
भ्रष्ट करी या बुद्धीला बुद्धीला ॥२॥

कर्म अकर्म या देहासी, साक्षी पाहीं तो अविनाशी ।
कर्माचे फळ देई त्याशी, पाप पुण्य हे बंध घालिती ।
भक्तिविण तरणें नाही कुणाला कुणाला ॥३॥

दया शांती हृदयी धरावी, तन त्यागिता किर्ती उरावी ।
सत्याचे आचरण करावे,
जैराम म्हणजे मनी विचार धरावे ॥४॥

## भजन क्र. ४६ (व्हारे व्हा जागृत व्हा...)

(चाल - या रे या गरीबांनो या)

व्हारे व्हा जागृत व्हा, मुखी रामनाम घ्या ।
तेव्हा जिवाला कांही तरी सुख हो ॥धृ॥

अंगी भरले विकार, त्यानी होता बेजार ।
यासी काढण्याचे शस्त्र धरा हो ।
काढा अवगूण मळ, व्हारे सर्व निर्मळ ।
देव दर्शन तयी तुम्हां देई हो ॥१॥

करा सत् व्यवहार, नाही खेड्यात सार ।
याच मार्गाने वाट पुढे जाई हो ।
प्रेम भावाने वाग, उदय होतील भाग ।
आली संधी ही खोवूं नका हो ॥२॥

काही परोपकार व्हावा, ऐसा मार्ग आकळावा ।
देह गेल्यावर कीर्ति मग राही हो ।
म्हणे जैरामदास, वेळ करू नका नाश ।
नाहीतर पुढे यमाचा पाश हो ॥३॥

## भजन क्र. ४७ (जरी सुख मार्ग...)

(चाल - निघू दे दिवस मंगल)

जरी सुख मार्ग बघतोसी, हरीनामा घे आधार ।
विषय नादी कां भूलतोसी, भले तुज यांत ना होणार ।।धृ॥

मोहनी घातली मायेने बांधिले अपूले फाशात ।
दिसे दृष्टीपुढे सर्व, क्षणिक हा सार संसार ॥१॥

ऋषी मुनी राजे नी योगी, आले हे जन्म घेवोनि,
राहिले ना इथे कोणी, काळाने केलें त्या ठार ॥२॥

लई जमवूनी ठेवीले राजपट द्रव्य गज घोडे ।
साथ ना देती हे सगळे, एकटा तूंचि जाणार ॥३॥

मी तू पण सोडूनी सारे, लाग रे प्रभू भजनास ।
तुटेल सर्व भवपाश, करी तू पूर्ण विचार ॥४॥

म्हणे जैराम ऐकूनि घे मिळाली संधि मोलाची ।
साध रे साध आताची, उभा आहे पूढे काळ ॥५॥

---

## भजन क्र. ४८ (गेली वेळ पून्हां न...)

(चाल - तेरी प्यारी प्यारी सुरत)

---

गेली वेळ पून्हां न मिळे रे, सावध हो मानवा ।
ही संधी खोवू नको ।
क्षणोक्षणी विचार करि रे, जागृत हो मानवा ।
ही संधी खोवू नको ॥धृ॥

कर्म तुझे जे करीत जा , सुख दुःखालाही सहित जा ।
नीती धर्मासी पाहूनिया, मन हरी भजनी लावित जा ।
निर्भयतेने कार्य करि रे, जागृत हो मानवा ॥१॥

किती दिवस मागे गेले, त्यावरी त्वांन ध्यान न दिले ।
माझे माझे म्हणूनिया, सारे दिवस काढिले ।
उरली वेळ ही साधूनि घेरे, जागृत हो मानवा ॥२॥

जन्म लाभला प्रभू दर्शनास, अमोल वेळ ही करू नको नाश ।
जैरामदास म्हणे साधी रे, नाही पुढें तुजला अवकाश ॥
सोड सोड विषयाच्या मौजा, जागृत हो मानवा ॥३॥

## भजन क्र. ४९ (चहाडी चुगलीत कसा तू...)

(चाल - दारू पिण्याला कशाला शिकला)

चहाडी चुगलीत कसा तू बसला रे, काम कराया कशाला रूसला ॥धृ॥

घरी मूल बाळ राही उपवासी, त्याची दैना नये तुजसी ।
वाईट संगती जाऊन फसला रे ॥१॥

न कळे तुला काम ते करणे । लागली किती रे वाईट व्यसने ।
यानेच कंगाल बनला रे ॥२॥

होती वडीलाची इस्टेट काही, विकूनी तिला दारूच्या पायी ।
धन द्रव्याचा पासी मूकला रे ॥३॥

धरली मुर्खाची संगती । त्याने भ्रष्ट झाली रे मती ।
दीन दुखीःयासी फसवोनी लुटला रे ॥४॥

तरूण दिसतो बघण्यात । आळसाने केली मात ।
स्वर्ण संधीचा वेळ गमाविला रे ॥५॥

गर्व थाटून डोलात राही, द्वेश भावाने सर्वास पाही ।
प्रेमभावाचा मार्ग हा चुकला रे ॥६॥

जैराम म्हणे सोड चाल, हे आहे रे दुःख मूल ।
सत वाटेने सूख हो जिवाला रे ॥७॥

## भजन क्र. ५० (पांडूरंगा तुजविण...)

(चाल - कैदमे है बुलबुल)

पांडूरंगा तुजविण मज नाही विसावा ।
हीन दीन दास मी चरणी दे ठावा ॥धृ॥

कुठवरी माझा अंत पाहसी, चैन नाही गा माझ्या मनाशी
जिकडे पहावे तिकडे दुःखःराशी, फिरतो वेड्यासम मी चहू दिशी
शक्तिहीन भक्तीहीन मति मंद ठेवा ॥१॥

कामक्रोध पाठीशी लागले , दिनरात असती चिन्ती बसले ।
सत्य वचना भंड पाडिले , आयुष्यहि सर्व गमाविले ।
काय करूं ना समजे मज बुद्धी दे देवा ॥२॥

कर जोडोनी विनवनी दासाची, हे चक्रपाणी कानी तू घेशी ।
कोट्या नू कोटी अपराध माझे, क्षमा करावे मज पामराशी ।
जैरामासी घडो तुझी जन्मोजन्मी सेवा ॥३॥

---

## भजन क्र. ५१ (खेळ प्रभू हा कैसा रचिला...)

(चाल - झूमता मौसम मस्त मदिना)

---

खेळ प्रभू हा कैसा रचिला, अन्त न लागे रे कोणाला ।
महिमा तुझी अपरंपार ॥धृ॥

धनिक किती तरी केले तूही । धन द्रव्याची कमीच नाही ।
खान पान मौजा करती । बैसोनिया मंजका वरती ॥१॥

दीन अतित्वां केले किती । अन्न वस्त्राची ही फजिती ।
राहण्या नाही कांही ठिकाना । तीळ मात्रहि चैन न त्यांना ॥२॥

रोगाने हे कष्टी किती । होतसे त्यांना दुःख अती ।
दुःखी होती हे आमरण । सांग मला हे कारण ॥३॥

कित्येकांना भक्ति दिली । तुझ्याच नामी ती रमली ।
सर्वस्व तुजला अर्पण केले । अंती तेहि तुझ्यात रमले ॥४॥

ऋषी मुनी हा तुझा महिमा । वर्णिता न पार पावे तुम्हा ।
पामर जैराम शरणी आला । सांगावे हरी आपण त्याला ॥५॥

## भजन क्र. ५२ (मित्रा कोण कुणाचे...)

(चाल - गुरूदेवाची महिमा न्यारी)

मित्रा कोण कुणाचे दुःख हरतो, त्याचे तोच कर्म फळ भोगतो ॥धृ॥

साधू संत मार्ग दर्शविती । जन्म मरणाच्या विरहित करती ।
स्वयं विदेही दशेवर चढती । विश्व व्यापक एक रूप बघतो ॥१॥

कर्ता असूनी अकर्ता राही । ऐसी गीता देते ग्वाही ।
अविनाशी साक्षी रूप पाही । कैवल्यांत बासूरी वाजवितो ॥२॥

पाप पूण्य जे करिती प्राणी । वर्म चुकती मूर्ख अडाणी ।
भोगतो चौऱ्याशी लक्ष योनी । कई भाग्याने मानव देह मिळतो ॥३॥

ज्याचे पदरी पूर्वीचे पूण्य । त्यांना होते आत्मदर्शन ।
तेव्हा जग हे करीत वंदन । जैराम म्हणे का अजून भूलतो ॥४॥

## भजन क्र. ५३ (पतिव्रता नेम, मनी...)

(चाल - बेगाने शादी मे)

पतिव्रता नेम, मनी हा धरावे,
पति आज्ञा आई बहिणीनी पाळावे ॥धृ॥

नारदमूनी आले, सावित्रीस कळविले ।
ज्याला तू मनांत वरण्याचे ठरविले ।
वर्षानंतर मरणार, हे खोटे न होणार, वचन माझे हे सत्य ।
कधी न टळणार ॥१॥

दिले तिने उत्तर, ऐके मुनिश्वर, मुक्तीची वेळ सांगा ।
लिहून मी घेणार
लग्न करीन मी खरे, याने होईल बरे, हट्टाने सावित्रीने ।
लग्न तेव्हांची केले ॥२॥

चार दिवस उरले, अन्न जल त्यागिले ।
मुक्तीच्या दिवशी तिने पतिशी न सोडिले ।
गेला सत्यवान, सावित्रीला घेऊन, मूर्च्छा आली गेला ।
झाडावरून उतरून ॥३॥

आले यमराजा, सत्यवानाच्या काजा ।
मांडीवर घेऊन त्याने पाहिले सावित्रीस आज ।
प्राण नेऊ लागला, तिने विचारला, घेऊन चालावे मज ।
म्हणे यमराजाला ॥४॥

वरदान मागावे, सवे नाही यावे,
सर्व काही देतो मी, तू ग परतावे ।
तिने वर मागला, राजपाट चांगला, सासू सासऱ्या डोळे, पूत्र ।
ईच्छा आहे मला ॥५॥

यम म्हणे बरे आहे, आस तुझी पूर्ण होय, सत्यवानाशी मज ।
आता नेऊ देय ।
सावित्री देई उत्तर, पुत्र कैसा होणार, तेव्हा यमराजाने ।
मानली आपूली हार ॥६॥

जयरामदास म्हणे, चाले जी नेमाने, जगा माजी किर्ती राही,
नांव घेती प्रेमाने ।
धन्य तिचे अवतार, सर्वांचा उद्धार तिन्ही लोकी सुखहोई,
ज्याचे बलावर ॥७॥

---

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची आठवण
## भजन क्र. ५४ (लोपले ज्ञान जगी फार...)

(चाल - गेला हरी कुण्या गावा)

---

लोपले ज्ञान जगी फार जन्मला मंजुळा देवी बाळ ।
जनाचा करण्या उद्धार पांहू चला मानीक या देवाला ॥धृ॥

जगी पसरली त्यांची किर्ती -ऐकोनी गेलो देण्या भेटी ।
तळमळ होती मनी मोठी-पाहण्याला गुरूकुंज आश्रमाला ॥१॥

बघण्या गुरूकुंज आश्रम-मनाला मिळाले विश्राम।
जसे कृष्णाचे गोकूळ धाम-दिसते ती लिला सर्व ॥२॥

सर्व पंथाचे माहेर-सर्वासाठी खुले द्वार ।
असो भारती, विदेशी नर ।
भेद नाही त्याला, सांगे शिस्तेने चाला ॥३॥

अनाथ बाळा करिता-काढीले भोजन शिक्षण संस्था ।
मार्ग दाविला सेवे करिता-लागा कामाला वाढवा उन्नतीला ॥४॥

सेवा भाव त्याचे भंग-घेऊन अहिंसेचे शरण ।
खंजरीने केले पवित्र-सर्व जनाचा द्वेषभाव मिटवीला ॥५॥

पाहूनी त्यांची दिनचर्या - दिपले नैन माझीया ।
मूर्ति भोळी ती सावरीया-जैरामाला समाधान,
मनाला धन्य त्या आईला ॥६॥

---

## भजन क्र. ५५ (तुम्हा सोडूनि गेले कुठे...)

(चाल - छुम छुम बाजे)

---

तुम्हा सोडूनि गेले कुठे यदुराया । कुणी सांगाना हो हे सखिया ।
दर्शनाविण चैनना ह्या मना । पाहू कुठे तूला मी रानावना ।
सूचेना बा मना दिपविले नयना ।
झालो मी पिसा बावरिया ॥१॥

तडफडतो ह्या जीव कसा बावरा, फिरतो हा जिकडे तिकडे फेरा ।
राही ना एक क्षणी, जातो चहू वनी ।
केव्हा भेट देशी देवराया ॥२॥

अहर्निश असो ही मजला चिंता, मनी पडली आहे भ्रमता ।

कैसा होऊ मी पार, घेऊ कुणाचा आधार ।
कैसी भेट होईल तुझी देवराया ॥३॥

देवाविण कैसा होईल उद्धार, जन्म घेऊनिया मिळाला नाही रे सार
घेतला संताचा अवतार, होण्या भवसिंधू पार ।
दर्शविण जैराम जन्म वाया ॥४॥

---

## भजन क्र. ५६ (तुजविण चैन ना या...)

(चाल - एक परदेशी)

---

तुजविण चैन ना या बावऱ्या मना, दर्शन द्यावें मज राधारमणा ।।धृ॥

सर्वस्व तुजला अर्पण करूनी तुझिया नामाच्या नादी लागोनी
मतिमंद दास मी आलों शरणा ॥१॥

शास्त्र पुराण ही वाचन केलें, मंदिरांत मी ध्यान धरिले
दिसला नाही तूं गा मंदीरांत कान्हा ॥२॥

पाहूनी आलों तिर्थस्थानी, परी न तूं दिसला चक्रपाणी
तळमळ लागतसे या नयना ॥३॥

रात्रंदिवस लागली चिंता, केव्हा भेट देसी तूं अनंता ।
झालो मी श्रांत तुझा अंत कळेना ॥४॥

साधू संगतीत जाऊन बैसलो, आसन मुद्रा मी लाविली
फिरविली माळा परि भ्रम मिटेना ॥५॥

कितीक संतानी बोध मज केला, परक्या जीवांच्या लाग सेवेला
जैराम म्हणजे सर्वांठायी पाहिला कान्हा ॥६॥

## भजन क्र. ५७ (काम नाही, राम नाही...)

(चाल - गुजराथ देश गांधी)

काम नाही, राम नाही, व्यर्थं हें जीणें ।
निष्काम बैसोनिया भूमि भार तो देणें ॥धृ॥

प्रेम नेम नाही मार्ग वाईट चालीचा ।
नित्य फिरत राही संगे लुबाडी यांचा ।
जगी येऊनिया अपकिर्ती करणें ॥१॥

ज्ञान ध्यान नाही अंगी बडबड करणें ।
लोकां फसवोनी आपण सूज्ञ म्हणविणें ।
माहीत नाही काळवेळ फुकट जिणे ॥२॥

लक्ष दे आयुष्यावर वेळ खोवूं नको ।
गर्व गुमाना मध्ये स्वस्थ बसू नको ।
वाट घेई सुगम तेव्हां होईल तरणें ॥३॥

लाग आता कामास म्हणे जैरामदास ।
उगीच बैसोनिया काय पाहतोस ।
जगामधे किर्ती राहील तयाने ॥४॥

## भजन क्र. ५८ (दुनिया दुःखी जीवा ...)

(चाल - दिसतो हरी हा भोळा)

दुनिया दुःखी जीवा, मन कळवळते हें देवा ॥धृ॥

चहू दिशी फिरतें हें मन, विसावा न पासी एक क्षण ।
भरून येते कींव माधवा ॥१॥

अन्न वस्त्राने दुःखी जन, फिरतों शोकाकुल होऊन ।
गेलो त्रासूनी केशवा ॥२॥

रात्रं दिवस चिंतातूर, क्षीण झालें याने शरीर ।
मज कांही सूचेना यादवा ॥३॥

कंठ येतो हा भरून, अश्रू गळती डोळ्यांतून ।
दूर्दशा या गरीब जीवा ॥४॥

जैराम म्हणे कधी भेटशी, तुम्ही यावे रक्षा करण्याशी ।
नम्र बोल कार्नी घ्यावा ॥५॥

---

## भजन क्र. ५९ (गड्या तूं ऐक हें ...)

(चाल - निघू दे दिवस मंगल तो)

---

गड्या तूं ऐक हें म्हणणं, मनाची लालसा सोड ।
सोडुनी खोटी संगती प्रभू चरणी मना जोड ॥धृ॥

चार दिवसांचे हें जीणें शेवटीं येथूनी जाणें ।
सोड तू मी तूं पणाला आधी कुसंगती सोड ॥१॥

हे सारे व्यर्थ हित धरूनि जें कर्म त्यांसी तू भूलला ।
भजन करि नित्य तूं प्रभूचे, प्रित विषयाची तू मोड ॥२॥

तरूणपण हाच्चि रे सगळा, स्त्री पुत्रामार्जी खोविला ।
वृद्धपर्णी सूचेना काही, रोगाने रडसी ढळढळ ॥३॥

निघून ही चालली वेळ, सुवर्ण संधि जन्माची ।
म्हणे जैराम रे मंनुजा प्रभूशी एकता जोड ॥४॥

---

## भजन क्र. ६० (स्वस्थ कसे बनले हो...)

(चाल - असा कसा तारील)

---

स्वस्थ कसे बनले हो गावंकरी, जागृत व्हा लवकरी लवकरी ।
संकट आले देशावर, तनमन धनाने व्हा तयार ।
शत्रूना हाका दूरी दूरी ॥१॥

एकतेचा मार्ग घेऊनी, आपसांतील फूट काढूनी ।
व्हा सर्व देश पुजारी, पुजारी ॥२॥

देशाचा गौरव वाढविण्या, अन्न पिकवा उन्नत होण्या ।
सावध व्हा तत्परी, तत्परी ॥३॥

शिक्षण घ्यावे लहान थोरीं, याने होईल अज्ञान दूरी ।
तेणे अस्पृश्यता निवारी, निवारी ॥४॥

मातृ भूमीचे ऋण हरण्या, आल्या जन्माचे सार्थक साधण्या ।
घ्या काम अपुल्या करि ॥५॥

नीति धर्मासी पाहूनी चाला, जैराम म्हणे होईल भले ।
हे घ्यावे सूत्र दोरी ॥६॥

---

## भजन क्र. ६१ (देवा कसा जाऊं तुझ्या...)

(चाल - असा कसा तारील)

---

देवा कसा जाऊं तुझ्या मंदिरी, पाहण्या ते स्वरूप सुंदरी ॥धृ॥

भव सागर हा मोठा कठीण, होऊ देत नाही येण जाण ।
फिरवतो हा मज माघारी माघारी ॥१॥

मोह माया ही लागली पाठी, विषयाच्या ह्या नेई घाटी ।
फिरविते ही चहू फेरी फेरी ॥२॥

हिचे पायी क्षीण झाली काया, स्वर्ण संधी जाते वाया ।
कसे होईल जिवन, उद्धरी उद्धरी ॥३॥

चिंता असे ही रात्रं दिवस, कसा तुटेल हा भव पाश ।
आता कृपा करा, मजवरी मजवरी ॥४॥

जैराम म्हणे अंती ना कोणी, सोडण्या फाशांतूनी ।
मार्ग दावी मज श्रीहरी श्रीहरी ॥५॥

## - पोवाडा -

### भजन क्र. ६२ (ऐक पार्वती नंदना...)

(चाल - मानसा सरळ हो असा)

ऐक पार्वती नंदना, करू वंदना आलो मी तुझिया चरणाशी ।
लाज तूं ठेव निजभक्ताची ॥ हो राम राम ॥
तूं बुद्धींचा सागर, सरस्वती वर,
ठेविशी ज्याचे शिरी कर ।
भिकारी होत नसे थोर ।
त्याला नाच कशाचाहि काळ ।
अशी तुझी लीला अपरंपार ॥१॥ हो राम राम

विघ्न नाशक तुझे नांव,पातक हरती सर्व ।
स्मरण करी तुझिया नामाचें ।
तन मन धन अर्पून साचे ।
तुझ्या रंगात सदा नाचे ।
तुटतील बंधन यमाचे ॥२॥ हो राम राम

असुरांचा केला संहार, पापी गजासुर,
रक्षा केली तूं भक्तांची ।
मार्ग तूं दाखविला साची ।
हाक ऐकावी आमुची ।
थोरवी तुझिया लिलेची ॥३॥ हो राम राम

किती वर्णू तुझे गुण, गेली जिव्हा थकून,
शेष-शारदा आणि ऋषी ।
लागेना अंतच कोणाशी ।
अज्ञानी आलो मी चरणांशी ।
लाज ठेव जैराम दासाची ॥४॥ हो राम राम

## भजन क्र. ६३ (मी पाहिन तुला...)

(चाल - मै देखूं जिस ओर सखीरी)

मी पाहिन तुला जिकडे हरी रे ।
तिकडे दर्शन देशील का ॥धृ॥

ज्या ज्या चुका होतील मजशी ।
त्याला देवा सांभाळशी ।
हीच विणवनी तुला रे, मी मागिन ते देशील का ॥१॥

भूललो देवा माये पायी,
जीव हा झाला त्राही त्राही ।
सूचत नाही मला काही, ठाव चरणी देशील का ॥२॥

जण हे म्हणती वेडा पीसा,
ठेवीन बोलाचा भरवसा ।
लाज ठेवी पंढरीनाथा, ब्रिद रक्षण्या येशील का ॥३॥

धन पुत्र हे मागने नाही,
मान बढाई नको मज ती ही ।
जैरामाला तुझा संग, जन्मो जन्मी देशील का ॥४॥

## भजन क्र. ६४ (भजन तूं आवडीने गातो...)

(चाल - मै देखूं जिस ओर सखीरी)

भजन तूं आवडीने गातो-त्या नियमाने वागतो का ॥धृ॥

जन हे म्हणती छान गाणारा । आहे म्हणती भक्त खरा ।
भरले तुझ्या अंगी विकार । याने तू रे तरशील का ॥१॥

गांजा दारू सोडत नाही । क्षणोक्षणी क्रोध येई ।
छळत राहतो परक्या जीवा । याने उद्धार होईल कां ॥२॥

मन नेई हा विषयाकडे । पर स्त्रीला पाहून मन ओढे ।
इन्द्रिया तुझ्या वंशी नाही । याने भक्ति साधेल का ॥३॥

क्षणोंक्षणी खोटे बोलणी । मंदिरी जाऊन पूजन करशी ।
लाऊन चंदन कपाळी टिळा । देव दर्शन देईल का ॥४॥

सोड असे हे ढोंग धतुरे । कर्म मानवाचे करी सारे ।
बोलावे तैसे चालावे जगी । त्याला उने होईल का ॥५॥

दया भाव हृदयी धरूनी । भक्ती करावे निर्मळ मनानी ।
जैराम म्हणें या बोलावर । लक्ष तु रे देशील का ॥६॥

---

## भजन क्र. ६५ (गरीबाच्या देवा...)

(चाल - एक परदेशी)

---

गरीबाच्या देवा तू कोठे झोपला,
कैसी नाही दयारे येत तुजला ॥धृ॥

अंत आमचे कुठवरी पाहसी, दिन दुखयाची का दया न घेसी ।
किती अत्याचार पहा आहे वाढला ॥१॥

भोळे पणाचा व्यवहार पाहूनी, स्वार्थी लोक हे बसले टपोनी ।
जिवनाचा करित असे मातेरा ॥२॥

आज युगामध्ये साव झाला चोर, घुसखोरी करणारा बनतो शिरजोर ।
पाहसी कां नाही या अन्यायाला ॥३॥

स्त्री पुरूषावरी ठेवी वरपांगीं प्रेम, पर व्यक्तिवरी ठेवतसे ध्यान ।
कैसा जगामध्ये हा पाप वाढला ॥४॥

पुत्र पित्याचा करी अपमान, धनासाठी घेत असे प्राण ।
''जैरामदास'' म्हणे देवा रक्षी ब्रिदाला ॥५॥

## भजन क्र. ६६ (लाभला जन्म हा मिळविण्या...)

(चाल - बेगाने शादीमें)

लाभला जन्म हा मिळविण्या देवाला,
मुर्खा तू का धन पुत्रात भूलला ॥धृ॥

जगात तू आला, सवे का घेतला ।
कोण जाणे कोण दिवशी, तुझा संग सोडणार ।
भटकत फिरतो तू, देवाला भुलतो तू ।
माझे माझे म्हणूनी, भ्रमात राहतों तू ॥१॥

संधी ही लाभली, अनमोल ही घडी ।
खोऊ नको वेड्या तू, व्यर्थ माया पायी ।
देह हा जाणार, काळोबा खाणार ।
कर तू विचार, सुधारेल जीवन ॥२॥

नाशिवंत देहाचा, करू नको भरवसा ।
गेला श्वास पुन्हा, कधी न येणार ।
राजा रंक फकीर, कुणी न राहणार ।
साध तू वेळेला, होईल उद्धार ॥३॥

जयरामदास म्हणे, संतसंग तू कर ।
संत संगाने, होशील तू भवसिंधू पार ।
देह गेल्यावर, किर्ती राहणार ।
करि तू भजन, मिटेल येण जाण ॥४॥

## भजन क्र. ६७ (या भोळे पणाचा फायदा...)

(चाल - भगवान मेरे प्यारे)

या भोळे पणाचा फायदा, स्वार्थानी काढीयेला ।
टाकुनी खोटा जाळा, त्राही त्राही जीव केला ॥धृ॥

एक म्हणतो हा चोर, काही म्हणती खरोखर ।
नाही केला विचार, मनी नाही शोध केला ॥१॥

विश्वास नाही वाणी, चिंता राहे सदोदिनी ।
कुणा सांगु गाऱ्हाणी, जीवा सुख देन्या ॥२॥

सोडुनी इमानदारी, आब्रु विकली सारी ।
द्रव्या करिता पक्षकार, देई खोट्या लोकाला ॥३॥

या खोट्या व्यवहाराने, देश कैसा टिकेल ।
सत्याचा हा मोल, काय होईल देशाला ॥४॥

म्हणे जयरामदास, सावध सर्व व्हावे ।
सोडुनी खोटे कर्म, लागा सत्य कर्माला ॥५॥

---

## भजन क्र. ६८ (पांडुरंगा देवा तुला...)

---

पांडुरंगा देवा तुला, येत नाही कीव रे ।
वाढला अत्याचार, घाबरला जीव रे ॥धृ॥

सत्ता तुझी ही असता, कां व्यभिचार रे ।
कृपाळू दयाळू नाथा का अशी वेळ रे ।
कसोटी नको घेऊ, आता ना धीर रे ॥१॥

मार्ग प्रेम भाव दयेचा, कळेना कुणाला ।
चिंतातूर होऊनी विसरी, भजन भाव खरा ।
त्वरा करा पांडुरंगा, धैर्य मनी देई रे ॥२॥

कुठवरी अंत पाहासी, त्रीभूवनी नाथा ।
भक्ताना व्याकूळ करूनी, लपू नको नाथा ।
''जयराम'' म्हणे ब्रीद, जात आहे प्रभू रे ॥३॥

## भजन क्र. ६९ (पाहाण्या जगी निघालो...)

(चाल - जब जब बहार आई)

पाहाण्या जगी निघालो, वाईट कुणी दिसेना ।
माझा मीच भ्रमणी ।
शोधीले आपले मन, मी मी ची आढळे धून ।
कां स्वार्थी माझे जीवन ॥धृ॥

आहेत अंगी दुर्गुण, समजेना मार्ग खरा ।
फिरतो कसा मी वेडा, लागे कुठे न थारा ।
ना चैन या जिवाला, हूर मनात दाटे ॥१॥
कां स्वार्थी..

ओढाळ वासने पायी, क्षिणली ही स्वर्ण काया ।
संसार या वणात, आयुष्य गेले वाया ।
अपराध कोटी कोटी, हा जीव मुक्त ना होई ॥२॥
कां स्वार्थी...

ना काम येई काही, मुखी रामनाम नाही ।
नेत्रा सदा ही द्वेष, सत्यात सत्य नाही ।
होऊ कुठे आधार, सोडू कुठे ही अडणी ॥३॥
कां स्वार्थी...

'जयराम' म्हणे सुखाचा तो एक मित्र देव ।
भेटी शिवाय त्याच्या, जिवारे नाही सुख ।
सत्संग विण कोणी, तरले न या जगात ॥४॥
कां स्वार्थी...

## - आरती -

(चाल : आरती ज्ञानराजा)

आरती सद्गुरूनाथा, तुमच्या चरणी राहो माथा ।
बुडलो या भवडोही, मार्ग दावा मज आता ॥धृ॥

भक्त तारण्यासाठी, तुम्ही घेता अवतार ।
अज्ञानासी ज्ञान देऊनी, तुम्ही केले भवपार ॥१॥

मोहमाया सोडूनी, करता नामाचा गजर ।
ऐकोनिया नाम, काल कापती थरथर ॥२॥

सोडोनि घरदार, नित्य परमार्थ व्यवहार ।
किती वर्णू गुरूदेवा, तुमची महिमा अपार ॥३॥

तुमचिया कृपेने, तुटती प्रपंच बंधन ।
चुकले आहेत वर्म, मार्ग दावावा सुगम ॥४॥

विनवनी जैरामाची, ऐकावी श्रीनाथा ।
आलो शरणागत, चुकवा चौऱ्याशीचा फासा ॥५॥


शिवलिंग
नंदि